॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागात एम.ए. योगशास्त्र, डिप्लोमा इन योगा टीचर, सर्टिफिकेट प्रोग्राम इन मसाज थेरपी या विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.

योग हा भारताचा समृद्ध वारसा आहे. आधुनिक काळात संपूर्ण जगभरात त्याचे महत्त्व आणखी वाढलेले आपणास दिसून येत आहे. भारतीय विद्यापीठांनी योग आणि ध्यानाचा मानवी आरोग्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांचे वैज्ञानिक पुरावे बळकट करण्यासाठी स्वतःला गुंतवणे अत्यावश्यक आहे. नियमित आणि समग्र दृष्टिकोनातून योगाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी, २१ जून २०२३ रोजी योगशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागांतर्गत एम.ए.योगशास्त्र, डिप्लोमा इन योगा टीचर, सर्टिफिकेट प्रोग्राम इन मसाज थेरपी असे शैक्षणिक अभ्यासक्रम आणि काही कौशल्य आधारित अल्पकालीन अभ्यासक्रम जसे प्री नॅटल पोस्ट नॅटल योगा गर्भसंस्कार टीचर्स ट्रेनिंग कोर्स, ओबेसिटी प्रीवेन्शन अँड डीसऑर्डर रेलीफ टीचर्स ट्रेनिंग कोर्स असे अभ्यासक्रम देखील चालवले जातात. योगशास्त्र विभागात प्रशस्त योग प्रॉप्स युक्त योग हॉल आणि सुसज्ज योगायुर्वेद युनिट असून या युनिट च्या अंतर्गत बॉडी मसाज, स्टीमबाथ, शिरोधारा, बस्ती, नस्य, वमन, जलनेती तसेच महिलांच्या सौंदर्य वृद्धी साठी आयुर्वेदिक फेस मसाज अश्या खूपच कमी दरात चांगल्या व दर्जेदार सुविधा देखील आहेत.

उच्च शैक्षणिक पात्रता प्राप्त आणि अनुभवी प्राध्यापक ही योगशास्त्र विभागाचे बलस्थाने आहेत. नियमित अध्यापन वेळेव्यतिरिक्त प्राध्यापक नेहमीच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास तत्पर असतात. एम. ए योगशास्त्र प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्णपदक ही दिले जाते. योगशास्त्र विषयात करिअर करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होवू शकते.

..............................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि.२ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बी.कॉम. अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस प्रा.डॉ. संगीता पाटील स्मृती प्रित्यर्थ सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

विद्यापीठास जळगाव येथील विजयसिंग पाटील यांनी प्रा.डॉ. संगीता पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ विद्यापीठास बी.कॉम. परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस सुवर्णपदक देण्यासाठी आवश्यक असलेला धनादेश कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे आज दि. २ जुलै, २०२५ रोजी सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे,वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, अनिकेत पाटील, डॉ. धनंजय गुजराथी उपस्थित होते.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता